

विद्या पर भूषणम्

विद्या विकास मंडळ

# विद्या विकास मंडळ, अंधेरी (प)

दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई -५८ दूरध्वनी- ७४००१५४६२८

## ६७ वा वार्षिक अहवाल

## सन २०२२-२०२३

www.vidyavikasmandal.com

info@vidyavikasmandal.com



## डॉ. भाल पाटील
## संस्थापक, विद्या विकास मंडळ
## आमचे प्रेरणास्थान

# विद्या विकास मंडळ, अंधेरी (प) मुंबई -५८


| | |
|---|---|
| विश्वस्त | श्रीम. नलिनी भाल पाटील |
| | श्री. समीर श्रीधर नाईक |
| | श्री. अंकुश शरदचंद्र मोहिले |
| अध्यक्ष | श्रीम. सुधा अरविंद राजे |
| उपाध्यक्ष | श्री. अरविंद जयवंत पाटील |
| कार्याध्यक्ष | श्री. किशोर प्रभाकर पाटील |
| सहकार्यवाह | श्री. अमित भाल पाटील |
| खजिनदार | श्री. विनायक मुकुंद दामले |
| कार्यकारी मंडळ सदस्य | श्रीम. नलिनी भाल पाटील |
| | श्री. संजीव श्रीराम मंत्री |
| | श्री. शिरीष साईनाथ चौबळ |
| | श्री. रमणिक मोरेश्वर म्हात्रे |
| | श्री. प्रफुल्ल उमाकांत म्हात्रे |
| | श्रीम. नीता अमित पाटील |

# कार्याध्यक्षांचे मनोगत

या वर्षीचे मनोगत व्यक्त करत असताना माझे मन भरून येत आहे,कारण आपल्या शाळेतील विद्यार्थी प्रिय आणि आमचे सर्वांचे लाडके जाधव सर यांचे आकस्मिक निधन झाले शाळा एका आदर्श शिक्षकाला मुकली आहे.तसेच आपल्या शाळेच्या स्थापनेपासून कार्यरत असलेल्या श्रीम.सुलोचना रांगणेकरबाई यांचे वार्धक्यामुळे निधन झाले.या दोघांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन ! रांगणेकरबाई शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या शाळेसंदर्भात विचारपूस करत असत.आपल्या शाळेतील मुलांसाठी त्यांनी काही शिष्यवृत्ती देखील दिल्या आहेत.

श्री.आजगावकर सरांच्या निवृतीनंतर शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून श्रीम.लटके मॅडम यांची नियुक्ती करण्यात आली.त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षकांच्या प्रामणिक प्रयत्नाने यावर्षी आपल्या शाळेचा शालान्त परीक्षेचा निकाल ८८.८ % लागला.सहा मुलांनी ८०% पेक्षा जास्त गुण संपादन केले.या सर्व मुलांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन !

प्रथम पाच क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ आपण साजरा केला त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्रीम.सुचिता देशपांडे आणि विशेष अतिथी श्री.अरुण वाधवा सर उपस्थित होते, सर्व मुलांना त्यांच्याकडून अत्यंत उपयुक्त असे मार्गदर्शन लाभले
विद्या विकास मंडळ हे एक कुटुंब आहे आणि या कुटुंबाला जोडलेल्या अनेक व्यक्ती आहेत.अनेक माजी विद्यार्थ्यांना आपल्या शाळेबद्दल आपुलकी आणि प्रेम वाटते . शाळेतल्या मुलांसाठी अनेक सोयीसुविधा आहेत.शाळेत A.V रूम आहे. तेथे सॉफ्टवेअरची व्यवस्था करण्यासाठी १९६७ च्या ११वी च्या बॅचने पन्नास हजार रुपये देणगी दिली आहे.या बॅचमधले काही विद्यार्थी आवर्जून A.V रूम पाहून गेले.

वि.वि.मंडळाच्या पुढाकाराने शाळेमध्ये विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.श्रीम.सविता दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने शांतावाडी येथील गिरीकुंज मध्ये आर्ट्स अँड क्राफ्ट स्किल्स डेव्हलपमेंट सेंटर उभारले आहे.लहानांपासून मोठ्यांपर्यत अनेकजण तिथे शिकण्यासाठी जातात.केवळ पुस्तकी शिक्षण न घेता आपल्यात असलेल्या इतर कलागुणांना वाव मिळावा यासाठी हा उपक्रम आहे.

श्री.संजीव मंत्री सरांच्या प्रयत्नाने प्राथमिक विभागातील मुलांना मल्लखांब आणि स्केटिंग यांचे प्रशिक्षण दिले जात आहे. शिशुकुलमध्ये देखील त्यांच्या पुढाकाराने फिटनेस अँड गेम शिकवण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक येतात.शिशुकुलमधील मुलांना रोज खाऊ दिला जातो. त्यांना हसत खेळत विविध गोष्टी शिकवल्या जातात.शाळा भेटीसाठी सुद्धा खास पाहुणे मंडळी येत असतात.
शाळेमध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात आणि संस्था प्रत्येक वेळी शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत असते.सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख श्रीम.नूतन गोडांबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत सामाजिक बांधिलकी जपत असतात.

या वर्षी प्राथमिक विभागाचा हिरक महोत्सव साजरा केला गेला. वर्षभर त्या विभागाने वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले होते आणि स्नेहसंमेलनाच्या दिवशी महोत्सवाची सांगता केली.
मागील वर्षी झालेल्या निवडणुकीत तीन कार्यकारिणी सभासदांची नियुक्ती झाली.श्री.रमणिक म्हात्रे,श्री.प्रफुल्ल म्हात्रे व श्रीम.नीता पाटील या तिघांचेही मी हार्दिक अभिनंदन आणि स्वागत करतो.
संस्थेने प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र समिती नेमली आहे.या कमिटीच्या मार्गदर्शनाखाली तिन्ही विभाग सुरळीतपणे सुरु आहेत.आपल्या शाळेत सादर होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती आपण Broadcasting group वर पाठवत असतो त्या संदर्भात अनेकांच्या प्रतिकिया मला मिळत असतात,आपल्या संस्थेच्या कुटुंबात अनेक जण सक्रीय होत असल्याने मला खूप आनंद वाटत आहे.

सध्या परिस्थिती पाहता मराठी माध्यमाच्या शाळेत मुलांना प्रवेश घेणं आवडत नाही किंवा त्याच्या पालकांना ते पटत नाही त्यामुळे शाळेत मुलांची पटसंख्या कमी होत आहे.अशा परिस्थितीत शाळेतील शिक्षकांनी वेगवेगळया ठिकाणी जाऊन पूर्ण नियोजन करून मुलांना आपल्या शाळेत येण्याचे आवाहन केले.शाळेत कोणकोणत्या गोष्टी अधिक चांगल्या तऱ्हेने सांगितल्या जातात त्याची माहिती दिली आणि त्यामुळेच आपल्या शाळेत जवळजवळ ३० विद्यार्थी माध्यमिक विभागात,बारा ते पंधरा विद्यार्थी प्राथमिक विभागात व शिशुकुल विभागात जवळजवळ तीस नवीन मुलांचे प्रवेश झाले आहे.याबद्दल सर्व शिक्षकांचे मनापासून आभार !

शाळेतील मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आपल्या संस्थेतील प्रत्येक व्यक्ती झटत आहे आणि कित्येकांच्या मदतीचा हात पुढे येत आहेत.त्या सर्वाचे मी मंडळातर्फे आभार मानतो.सर्वांच्या सहकार्याने आपली शाळा अधिक उंचीवर नेऊन ठेवण्याचा माझा मानस आहे.

आपला कृपाभिलाषी

किशोर प्रभाकर पाटील
कार्याध्यक्ष

## माध्यमिक विभाग वार्षिक अहवाल

## १ ऑक्टोबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२३

देशाचे भवितव्य तरुण पिढीच्या हातात असते.आणि म्हणूनच देशाला प्रगती पथावर नेण्यासाठी सजग, सुजाण,सुसंस्कारित तरुण पिढी तयार होणे ही प्रत्येक देशाची गरज असते.शिक्षणाच्या माध्यमातून बदलत्या काळाची ही गरज लक्षात घेऊन जुन्या नव्याचा मेळ साधत अशी पिढी घडवता येते.भारतीय संस्कृतीतून होणारे मूल्य संस्कार,जीवनविषयक शिकवण,वैज्ञानिक दृष्टीकोन आणि तार्किक विचारप्रवृत्ती यांचा समन्वय साधत विद्यार्थ्यांवर संस्कार करावे लागतात.खरंतर विविध अभ्यासक्रमांच्या ,उद्योगसमूहांच्या,आंतरराष्ट्रीय दर्जा असणाऱ्या शाळांच्या वाढत्या स्पर्धेला सामोरे जात मराठी शाळा सुरु ठेवणे आणि विद्यार्थी घडविणे हे खूप मोठे आव्हान आहे.पण तरीही आमची मातृसंस्था विद्या विकास मंडळ निर्धारपूर्वक मराठी माध्यमाची शाळा चालविण्याचा प्रयत्न करते आहे.आमच्या शाळेत कष्टकरी श्रमजीवी वर्गातले विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहेत.या मुलांचे दैनंदिन जगणे हाच संघर्ष आहे.परिणामी साहजिकच मुलांचा व्यक्तिमत्व विकास,त्यांच्या शिक्षणासाठी पोषक वातावरण आणि सकस आहाराचा अभाव जाणवतो.अनेक विद्यार्थ्यांना पोटभर अन्न मिळते का हा प्रश्न अंतर्मुख करतो.बरेचसे विद्यार्थी कुटुंबाला हातभार लावण्यासाठी वर्तमान पत्र टाकणे,बँड पथकात काम करून शाळेत येतात.काही विद्यार्थी शाळेची नियमित फी सुद्धा भरू शकत नाहीत.मग त्यांच्या मदतीसाठी समाजातील काही सधन संवेदनशील व्यक्ती पुढे येतात आणि सढळ हस्ते मदत करतात.अशा मुलांसाठी आम्ही वर्षभर अनेक उपक्रम राबवीत असतो त्या उपक्रमांचा थोडक्यात घेतलेला आढावा

### भोंडला

ऐलमा पैलमा गणेश देवा ....,एक लिंबू झेलू बाई .....,सारख्या अनेकविध गीतांसह आकर्षक नृत्योत्सवात शाळेत शनिवार दि.१ ऑक्टोबर २०२२ रोजी भोंडला रंगला.मुलींचा सहभाग उत्साहवर्धक होता.मुलीनी भोंडला गीतांवर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.आपली संस्कृती व परंपरा जपण्यासाठी असे कार्यक्रम शाळेत साजरे व्हायला हवेत असे प्रतिपादन या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहिलेल्या डॉ.ज्योत्स्ना कुलकर्णी यांनी केले.पाटावर हत्तीची प्रतिकृती ठेवून पाटासभोवती फुलांची रांगोळी काढली होती.हत्तीच्या प्रतिमेचे पूजन डॉ.ज्योत्स्ना कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.सर्वांना भोंडल्याची खिरापत श्री.जितेंद्र पेडणेकर यांनी दिली.

### वाचन प्रेरणा दिन

माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो.यावेळी डॉ.कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीम.वसुंधरा देवधर यांच्या हस्ते करण्यात आले.स्वलिखित कथा ऐकवून त्यांनी मुलांना मंत्रमुग्ध केले.

### दीपोत्सव

शाळेत दिवाळीनिमित्त मातीचे किल्ले तयार करणे, रांगोळ्या काढणे आकाशकंदील व शुभेच्छा पत्र तयार करणे या स्पर्धा घेण्यात आल्या.मुलांनी अतिशय उत्साहाने किल्ल्यांच्या सुबक प्रतिकृती तयार केल्या. तयार केलेल्या आकाश दिव्यांनी, व्हरांड्यात रांगोळ्या काढून मुलांनी शाळा सजवली.

### एक दिवसीय सहल व स्काउट गाईड शिबिर

स्काउट गाईडचे दोन दिवसीय शिबिर ७ व ८ डिसेंबर २०२२ रोजी आंबिवली येथे भरविले होते. इ.५ वी ते ८ वी च्या मुलांची एक दिवसीय सहल सगुणा बाग येथे दि. ८ डिसेंबर २०२२ रोजी गेली होती.

**क्रीडा महोत्सव**

२२ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२२ या काळात संपन्न झालेल्या शाळेच्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन माजी विद्यार्थी राजेश नारकर यांच्या हस्ते झाले.यावेळी क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली.दोन दिवस सांघिक व वैयक्तिक सामने खेळले गेले.क्रीडा महोत्सवाचा समारोप आजी माजी विद्यार्थांच्या सामन्याने होतो.ही शाळेची एक परंपरा आहे.कोविडच्या दोन वर्षात क्रीडा महोत्सव होऊ शकला नाही.परंतु या दोन वर्षातली भरपाई माजी विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती लावून केली.अनेक माजी विद्यार्थी खेळाडू म्हणून सहभागी झाले.सामन्याचे पंच म्हणून काम केले.संदीप बेंद्रे, समीर जाधव,सचिन राऊळ व सोनाली सुर्वे यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ दिला.विजेत्यांसाठी या माजी विद्यार्थ्यांनी आकर्षक चषक दिले.या वर्षीचा क्रीडा महोत्सव या माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने अत्यंत जल्लोषात पार पडला.

**स्नेहसंमेलन वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

शनिवार दि.७ जानेवारी २०२३ रोजी या शैक्षणिक वर्षाचे स्नेहसंमेलन संपन्न झाले.समारंभाच्या प्रमुख पाहुण्या बालमोहन विद्यामंदिर दादरच्या माजी मुख्याध्यापिका श्रीम.विजया चौधरी होत्या.१९९५च्या शालान्त परीक्षेचे विद्यार्थी महेंद्र शिंदे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.मुलांनी सांस्कृतिक गुणदर्शन नृत्याच्या माध्यमातून केले.यावर्षी विद्या विकास कलामंचाच्या माध्यमातून सुरु झालेले तबला वादन व कथ्थक नृत्य उपक्रमातील सहभागी विद्यार्थिनींनी खूप छान सादरीकरण केले.१९७६ च्या SSC वर्गाचे माजी विद्यार्थी श्री.अनिल वैद्य या मुलींना प्रशिक्षित करीत आहेत.

स्नेहसंमेलनानिमित्त चित्र, हस्त ,रांगोळी काढणे,विज्ञान व गणित प्रदर्शन भरविण्यात आले होते.या प्रदर्शनाचे उद्घाटन वि.वि.मंडळाचे कोषाध्यक्ष श्री.विनायक दामले यांनी केले.प्रमुख पाहुणे.SPIT चे प्राध्यापक श्री.गोविंद हळदणकर होते.मान्यवरांनी मुलांच्या कल्पकतेचे कौतुक केले.

**प्रजासत्ताक दिन**

२६ जानेवारी २०२३ रोजी ७४ व्या  प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण शालान्त परिक्षा वर्ष १९९६ चा विद्यार्थी अंकुश घोलप च्या हस्ते झाले.अंकुश बरोबर इंडियन रॉयल रायडर्स चे त्याचे सहकारी ध्वजवंदनासाठी उपस्थित होते.या सर्वांनी दहावीच्या मुलांना writting pad व मुलांना चॉकलेट्स दिली.श्री.जितेंद्र पेडणेकर यांनी उपस्थितांसाठी अल्पोपहार व मुलांना खाऊ दिला.

**शिवजयंती**

१९ फेब्रुवारी २०२३ रोजी ३९३ व्या शिवजयंतीनिमित्ताने भाषा संवर्धक शिवराय  ही नाटिका सादर करण्यात आली.या नाटिकेचे संहिता लेखन माजी विद्यार्थी श्री. योगेश पवार यांनी केले.यावेळी  मुलांनी लाठी काठी प्रात्यक्षिके सादर केली. शिवरायांच्या जीवनातील काही प्रसंगांचे विद्यार्थ्यांनी वर्णन केले.

**जागतिक मराठी राजभाषा दिन**

२७ फेब्रुवारी २०२३ रोजी जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी लेझीम व वाद्यांच्या तालावर ग्रंथदिंडी काढली.मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने घेतल्या गेलेल्या स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांनी यावेळी सादरीकरण केले.कथाकथन,अभिवाचन, कवितावाचन व एकपात्री अभिनय यास्पर्धां मधील विजेत्या विद्यार्थ्यांना पुस्तकरूपात बक्षिसे मान्यवर अतिथी श्रीम.कांचन जोशी यांच्या हस्ते देण्यात आली.त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.तसेच एका कथेचे खूप सुंदर पद्धतीने अभिवाचन करून दाखविले.सर्वांनी  मराठी भाषेची प्रतिज्ञा घेतली.

**राष्ट्रीय विज्ञान दिन**

दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन चंद्रशेखर रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो.विमान उड्डाण शास्त्र म्हणजे काय? विमानांच्या प्रतिकृती कशा करता येतात याबद्दल मुलांना  माजी विद्यार्थी समीर कदम यांनी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.मुलांनी अतिशय उत्साहाने यात सहभाग घेतला.

**विद्या विकास मंडळ आर्ट्स अँड स्किल्स डेव्हलपमेंट सेंटरचा उद्घाटन सोहळा**

शुक्रवार दि.७ एप्रिल २०२३ रोजी शांतावाडीतील शाळेच्या जुन्या जागेत सुप्रसिद्ध चित्रकार श्रीम.चंद्रिका कामत यांच्या हस्ते संपन्न झाला.यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी ,हितचिंतक व विद्या विकास मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.या कला केंद्रात श्रीम.सविता दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना विविध कला शिकविण्यात येतात.क्ले आर्ट,पेपर क्राफ्ट,डेकोपाज,मंडला आर्ट,इ.विविध कला प्रकार कार्यशाळेतून शिकविले जातात.या कलाप्रकारांसाठी लागणारे सर्व साहित्य केंद्रातच उपलब्ध आहे.माजी विद्यार्थी श्री.हेरंब दोंदे यांनी अगदी कमी कालावधीत या केंद्राचे सुशोभीकरण करून या सेंटरच्या उभारणीत मोठा हातभार लावला.

**जर्मन पाहुण्यांची भेट**

कनेक्ट केमिकल्स जर्मनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. डर्क ऑटमर,श्री.बसार कराका व कनेक्ट केमिकल्स इंडिया प्रा.लि.चे संचालक श्री. सुरेश मांजरेकर यांनी मंगळवार दि.१८एप्रिल २०२३ रोजी शाळेला सदिच्छा भेट दिली. पाहुण्यांचे भारतीय पारंपारिक पद्धतीने औक्षण केले .शाळेला या आस्थापनाकडून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पाच अद्ययावत संगणक भेट देण्यात आले.या पदाधिकाऱ्यांनी वाचनालय, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक कक्षात विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला.मुलांनी देखील पाहुण्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी विद्या विकास मंडळाचे विश्वस्त श्री.समीर नाईक,श्री.अंकुश मोहिले,व पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. डॉ.ज्योती भाबल या माजी विद्यार्थिनीने वाचनालयातील उपक्रमांविषयी माहिती दिली.पाहुण्यांना मुलांनी तयार केलेली शुभेच्छापत्रे देण्यात आली.शाळेकडून झालेल्या आदरातिथ्याने परदेशी पाहुणे भारावून गेले.

**भिंत सुशोभीकरण**

शनिवार दि.२२ एप्रिल २०२३ रोजी शाळेच्या परसबागेची भिंत चित्रांकित करण्यात आली.भिंतीच्या सुशोभीकरणात आजी विद्यार्थ्यांबरोबरीने माजी विद्यार्थी देखील उत्साहाने सहभागी झाले होते.श्री.संजीव मंत्री,प्रशांत नरवणकर काश्मिरी राउळ,सुजाता मापुस्कर वेदिका सकपाळ या माजी विद्यार्थ्यांची या उपक्रमात मोलाची मदत झाली.

**महाराष्ट्र दिन**

महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी ध्वजारोहण करण्यात आले.इ.५वी ते ९ वी वार्षिक परीक्षा निकाल जाहीर करण्यात आला.

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४**

**शाळेचा पहिला दिवस**

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर दि. १५ जून २०२३ रोजी शाळा भरली.नवीन गणवेश घालून मुले शाळेत अतिशय उत्साहाने आली.शाळेच्या प्रवेशद्वारावर मुलांचे सर्व शिक्षकांनी गुलाब देऊन ढोलताश्यांच्या गजरात स्वागत केले. पहिल्याच दिवशी शासन योजनेतून मिळणाऱ्या पाठ्यपुस्तकांचे वितरण मुख्याध्यापिका श्रीम.लटके यांच्या हस्ते करण्यात आले..

**मार्च २०२३ शालान्त परीक्षा निकाल**

**शाळेचा निकाल ८८.८९% लागला.**

**विशेष श्रेणी ९, प्रथम श्रेणी१५, द्वितीय श्रेणी ९, तृतीय श्रेणी ७**

| | |
|---|---|
| पहिला क्रमांक: कु.दुर्गा अप्पाराव बरमदे | ८९.२०% |
| दुसरा क्रमांक: कु.संस्कृती सुनील भालेराव | ८८.२०% |
| तिसरा क्रमांक: कु.आयेशा नूर मोहम्मद नाईक | ८७.८० % |
| चौथा क्रमांक: कु.प्राची प्रशांत जाबरे | ८७.६० % |
| पाचवा क्रमांक: कु.श्रीधर मनीष पांचाळ | ८६.२०% |

**जागतिक योग दिन**

२१जून हा दिवस संपूर्ण विश्वभरात योग दिन म्हणून साजरा केला जातो.अंबिका योग कुटीरच्या सुधा किन्हलेकर व प्रशांत चेम्बुरकर,श्रीम.उषा हणमंते,व श्री.धीरेन मतानी या योग साधकांनी २१ जून २०२३ रोजी शाळेत मुलांना योग दिनाचे महत्व सांगून प्रात्यक्षिके करून दाखवली व मुलांकडून योगासने करवून घेतली

**नेत्र तपासणी शिबिर**

रोटरी क्लब ऑफ जुहू यांच्या वतीने १ जुलै २०२३ रोजी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.मुलांची तज्ज्ञ डॉक्टरांनी नेत्र तपासणी केली.दृष्टीदोष असलेल्या विद्यार्थ्यांना श्री.अरुण वाधवा व श्री.हेमांग जांगला यांच्या हस्ते चष्मे देण्यात आले.

**गुरूपौर्णिमा**

विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले असं सांगणाऱ्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांना वंदन करून गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली.प्रथेप्रमाणे कथाकथन स्पर्धा घेण्यात आली.मुलांनी गुरूपौर्णिमा आणि गुरूंचे महत्व सांगितले.शाळेतल्या मुलांना समाजातील दानशूर व्यक्तींकडून मदत मिळते.आपणही समाजाचे काही देणे लागतो किती द्या या पेक्षा काहीतरी द्या आणि हे देणे योग्य गरजवंतांसाठी द्यावे हा संस्कार शाळेत मुलांवर केला जातो.गुरूपौर्णिमेनिमित्त ठेवलेल्या दान कलशात मुलांनी स्वेच्छेने गुरुदक्षिणा वाहिली.यातून जमा झालेल्या रकमेचा विनियोग सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेला देण्यात येईल असा विचार झाला.

**चला जाणूया नदीला**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त चला जाणूया नदीला हे अभियान राबविले गेले.दि.२४ जुलै ते २९ जुलै २०२३ या कालावधीत घोषवाक्ये तयार करणे,चित्रकला,वक्तृत्व,निबंध ,अभिनय इ.स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.पर्यावरण विषयक समस्यांवर आधारित माती,झाडे,जंगले आणि नद्यांची स्थिती या विषयांच्या अनुषंगाने मुलांनी सहभाग नोंदविला.जिल्हास्तरावर राबविण्यात आलेल्या या उपक्रमात १७४ शाळांनी भाग घेतला होता.आपल्या शाळेचा पाचवा क्रमांक आला, यावेळी शाळेला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**कौतुक सोहळा**

शालान्त परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थांचा कौतुक सोहळा शनिवार दि.२२जुलै २०२३ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सोहळयासाठी वरिष्ठ पत्रकार व लेखिका श्रीम.सुचिता देशपांडे या प्रमुख अतिथी होत्या. विशेष अतिथी रोटरी क्लब ऑफ मुंबई जुहूचे अध्यक्ष श्री.अरुण वाधवा होते. गुणवंत विद्यार्थ्यांना विद्या विकास मंडळ संस्थेकडून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती, भेटवस्तू व , सन्मानचिन्ह देण्यात आली.तसेच माजी विद्यार्थी व समाजातील मान्यवर व्यक्तींतर्फे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तींचे देखील वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.प्रतिवर्षाप्रमाणे तक्षील फाउंडेशनच्या संचालिका श्रीम.रेमिला पुरवनकारा यांच्या हस्ते रोख पारितोषिक व सन्मान चिन्ह देण्यात आले.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांचा देखील सन्मान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट२०२३**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी सोहळ्याचा सांगता समारंभ अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यालयाच्या परंपरेनुसार शालान्त परीक्षा वर्ष २०२२-२३ मध्ये विद्यार्थिनींमधून प्रथम आलेली दुर्गा बरमदे हिच्या हस्ते ध्वजारोहण झाले.स्काउट गाईडच्या विद्यार्थ्यांनी संचलन केले. मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत मुलांनी या सोहळयास अनुसरून काढलेली आकर्षक चित्रे भिंतीवर लावण्यात आली होती.अमृतकलशात वडाचे रोपटे लावण्यात आले.अनेक माजी विद्यार्थी व पालक यावेळी उपस्थित होते.सर्वांनी पंचप्रण प्रतिज्ञा घेतली.समूहगीत स्पर्धेतील विजेत्या वर्गानी देशभक्तीपर गीते गायली. उपस्थितांना माजी विद्यार्थी श्री.जितेंद्र पेडणेकर यांच्याकडून अल्पोपहार देण्यात आला.

**राखी एक स्नेहबंध**

भारतीय संस्कृतीत भावाबहिणीच्या नात्याला अनन्यसाधारण महत्व आहे.समाजातील आपले पाठीराखे व हितचिंतक आपल्याला शिक्षणातील विविध संधी मिळवून देतात अशी कृतज्ञतेची भावना व्यक्तया मान्यवरांच्या मनगटावर राखीचा पवित्र धागा बांधून करतात.शाळेच्या परिसरातील हितचिंतक,माजी विद्यार्थी पोलीस डॉक्टर यांना मुली त्यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन राखी बांधतात.अनेक व्यक्तींना टपालाद्वारे राख्या पाठविल्या जातात.

**गणपती तयार करण्याची कार्यशाळा**

गणेशोत्सवापूर्वी गणेश मूर्ती साकारण्याचा आनंद मुलांना स्वनिर्मितीतून मिळवून देण्यासाठी शालान्त परीक्षा वर्ष २००० चे विद्यार्थी वैभव पटवर्धन,आशिष म्हात्रे व प्रशांत नरवणकर यांनी पर्यावरण स्नेही शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा रविवार दि. १० सप्टेंबर २०२३ रोजी घेतली.

इ.७ वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.प्रथम तीन क्रमांक विजेत्या गणेश मूर्ती कलाकार विद्यार्थ्यांना विद्या विकास मंडळ कार्यकारिणी सभासद श्री.संजीव मंत्री यांनी त्यांच्या आई स्व.रेखा मंत्री यांच्या स्मृतिप्रित्यर्थ बक्षिसे दिली.या मूर्तींचे विसर्जन शाळेच्या आवारात कृत्रिम विहिरीत केले जाणार असून तयार माती शाळेच्या परसबागेसाठी वापरण्यात येईल.

**आधार बदलापूर भेट**

१३ सप्टेंबर२०२३ रोजी बदलापूर येथील मानसिक दृष्ट्या अक्षम विशेष मुलांच्या आश्रमाला भेट देण्याची संधी विद्यालयातील इ.८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांना मिळाली.या भेटीसाठी जाण्यायेण्याची सोय व भोजन व्यवस्था या आश्रमाचे विश्वस्त श्री.अरुण वाधवा यांनी केली.

**अथर्वशीर्ष पठण ३० सप्टेंबर २०२३**

शाळेच्या३२ विद्यार्थ्यांनी आझाद नगर येथील अंधेरीच्या राजाच्या मंडपात अथर्वशीर्षाची ११ आवर्तने करणार आहेत.

**शालेय व आंतरशालेय स्पर्धा**

या विविध कार्यक्रमांबरोबरीने अनेक शालेय व आंतरशालेय स्पर्धांमध्ये विद्यार्थी उत्साहाने सहभागी होतात.वेगवेगळ्या दिनांचे व घटनांचे औचित्य साधून स्पर्धा घेतल्या जातात.यात कथाकथन,वक्तृत्व निबंधलेखन,एकपात्री अभिनय,पोस्टर स्पर्धा तसेच भेटकार्ड तयार करणे,अशा विविध स्पर्धांचा देखील समावेश होता.शासनाकडून वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

महाराष्ट्र राज्य परिषदेतर्फे घेण्यात इ.५ वी व ८वी साठी घेण्यात येणारी शिष्यवृत्ती परीक्षा, डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा,शासकीय चित्रकला स्पर्धा नियोजित आहेत.

आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना परीक्षा(NMMS) परीक्षेत यावर्षी इ.९वीतील तन्वी टिपराळे,शाकंबरी चौगुले आणि सिद्धी मालप या विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती मिळाली.

**मदतीचे हात**

तक्षील फाउंडेशनकडून श्रीम.रेमिला पुरवनकारा यांनी मागील वर्षी रु २५०००/- शालोपयोगी वस्तूंच्या खरेदीसाठी मिळाले.यातून दहा whiteboard घेतले,यावर्षी मिळालेल्या पैश्यांचा विनियोग दृक्श्राव्य वर्गखोली करण्यासाठी करणार आहोत.

माजी विद्यार्थ्यांची vvalumni या संघटनेकडून मागील बारा वर्षे इ.दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता अत्यंत उपयुक्त तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यानमाला आयोजित केली जाते.

१९९६-९७ च्या दहावी अ च्या विद्यार्थ्यांकडून इयत्ता ९वी व १०वी च्या मुलांसाठी प्रत्येकी १० संच पुस्तके व ६० डझन वह्या मिळाल्या.

रोटरी क्लब ऑफ मुंबई जुहू व माकाबो यांच्याकडून दोन विद्यार्थ्यांना संगणक व दोन विद्यार्थ्यांना लॅपटॉप श्री. हेमांग जांगला यांच्या मदतीने मिळाले.

एस.पी जैन मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट तर्फे अभ्युदय सितारा या उपक्रमात इ. ६वीच्या मुलांची निवड करण्यात आली आहे.

कोटक एज्युकेशन फाउंडेशन मागील दोन वर्षांपासून शाळेच्या विकासासाठी मदत करत आहे.गुरु या त्यांच्या उपक्रमांतर्गत इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना टॅब देण्यात आले.या संस्थेच्या माध्यमातून मुलांसाठी इंग्रजी संभाषण वर्ग,संगीत वर्ग चालविले जातात.

School Nutrition Kitchen Garden या प्रकल्पांतर्गत वांगी,टोमॅटो,मिरच्या,मुळा व पालक या भाज्यांची  लागवड केली.मुलांनी जमिनीची मशागत करणे, बिया रुजविणे,रोपांना पाणी घालणे ही सर्व कामे उत्साहाने केली.या प्रकल्पासाठी लागणारे तिसऱ्या टप्प्यासाठीचे अर्थसहाय्य श्री. हेमांग जांगला यांनी मिळवून दिले.
१९६७ च्या शालान्त परीक्षा वर्गाने इ-लर्निंग सॉफ्टवेअरसाठी मदत केली.त्यामुळे इ.५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांना मुलभूत संकल्पना स्पष्ट करणे सोपे जाते.

अवंतिका फाउंडेशन,सलाम मुंबई फाउंडेशन,अर्पण पब्लिक  यांच्यातर्फे किशोरवयीन मुलांना कार्यशाळांमधून विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

ITFL वेल्थ फाउंडेशन यांच्या स्टेम शक्ती कार्यक्रमांतर्गत इ. ६वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांची रोबोटिक्स कार्यशाळा घेतली जाते.

अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन या संस्थेमार्फत आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जातात.उन्हाळी व हिवाळी कॅम्प, दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून विज्ञान प्रदर्शन यामुळे विद्यार्थ्यामधील कुतूहल, जिज्ञासा व आत्मविश्वास वाढण्यास मदत होते.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वळण्याचा कल अधिक वाढू लागला आहे त्यामुळे शाळेच्या पटसंख्येवर परिणाम होत आहे.इंग्रजीचा पगडा अधिक असल्याने इंग्रजी आले तरच शिक्षण अशी चुकीची धारणा झाली आहे.आम्ही मातृभाषेतून अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा सुसंस्कारित पिढी घडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.यामध्ये आमचे हितचिंतक, माजी विद्यार्थी व आमची संस्था वि.वि.मंडळ यांचे खूप मोठे योगदान आहे.

श्रीम.नूतन गोडांबे
सांस्कृतिक विभाग प्रमुख

श्रीम.सुप्रिया लटके
मुख्याध्यापिका

## विद्या विकास मंडळ प्राथमिक विभाग

## वार्षिक अहवाल २०२२–२३

प्रिय अशीही शाळा आमची ज्यावर आम्ही काय लिहावे ? महती तिची गाता गाता शब्दांनीही कमी पडावे ....... असे जिचे वर्णन करता येईल ती आमची विदया विकास मंडळ प्राथमिक शाळा . २०२२–२३ हे प्राथमिक विभागाचे हीरक महोत्सवी वर्ष.यानिमित्त शाळेत घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अहवाल सादर करीत आहोत.

**आमचे वैविध्यपूर्ण उपक्रम :**

मल्लखांब विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी जास्तीत जास्त व्यायाम होणारा जगातील एकमेव असा हा क्रीडा प्रकार शाळेत अनेक वर्षापासून सुरु आहे.श्री.पवार सर यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली विद्यार्थी या क्रीडा प्रकारात कौशल्य संपादन करीत आहेत.

श्री.पंकज तुपे यांच्या उत्तम प्रशिक्षणामुळे व विद्यार्थी अतिशय कमी वेळात स्केटिंगचे कौशल्य संपादन करतात.शरीराची लवचिकता वाढवणाऱ्या या खेळाचा मुले मागील काही वर्षापासून आनंद घेत आहेत.

मल्लखांब व स्केटिंग हे दोन्ही उपक्रम पुन्हा नव्याने सुरु करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी भरघोस आर्थिक मदत केली आहे.

अभ्यासाबरोबर मुलांच्या बालमनावर उत्तम सुसंस्कार घडावेत या हेतूने जीवन विद्या मिशन या संस्थेतर्फे संस्कार वर्ग सुरु आहेत.

मुंबई ग्राहक पंचायतीच्या अंधेरी शिक्षण विभागाच्या पदाधिकारी श्रीम.ज्योती मोडक व श्रीम.सविता दोंदे यांच्या प्रयत्नाने शाळेत पर्यावरण संवर्धक असा उपक्रम घेण्यात आला,.स्टीक मुक्त परिसराच्या दिशेने आमच्या विदयार्थ्यांनी हा स्तुत्य उपक्रम राबविला.

पंजाब नॅशनल बँकेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या जोश ग्रुपतर्फे विदयार्थ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.श्रीम.मानसी गवाणकर यांनी यावेळी कापडी पिशव्यांचे महत्व व पर्यावरणा विषयी विदयार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण केली.

इ १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना ई–लर्निंग द्वारे अध्यापन केले जाते.गाणी ,गोष्टीचा आनंद घेत नवनवीन गोष्टीचा विदयार्थी आनंद घेतात. हेच खरे आनंददायी शिक्षण.

संगणक हा आजच्या आधुनिक युगाचा आत्मा आहे.शिक्षण क्षेत्रातील संगणकाचे महत्व ओळखून शाळेतील संगणक कक्षात इ . पहिली पासूनच विदयार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण दिले जात आहे.

शाळेच्या सुसज्ज वाचनालयात जाऊन विदयार्थी वाचनाचा आनंद घेत आहेत.शिक्षक लहान मुलांना स्वतः वाचून दाखवतात. विदयार्थ्यांमध्ये यामुळे वाचनाची गोडी निर्माण होत आहे.

१२ ऑगस्टला vision for a cause/ school children eye screening program च्या माध्यमातून विदयार्थ्यांचे डोळे तपासण्यात आले.गरजू विदयार्थ्यांना चष्मे देण्यात आले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात विदयार्थ्यांना आरोग्या विषयी योग्य मार्गदर्शन करण्यात आले . महानगरपालिकेच्या आरोग्यविभागातर्फे देण्यात जंत नाशक गोळ्यांचे मुलांना वाटप करण्यात आले.

आजूबाजूच्या परिसरातील सर्व पालकांना,विदयार्थ्यांना शाळेची ओळख करून देण्यासाठी अंगणवाडीतील विदयार्थ्यांच्या पालकांच्या सभा घेतल्या.यावेळी पालकांना भेटकार्ड व विदयार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रम : विदयार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेच्या भव्य पटांगणावर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन फेब्रुवारी महिन्यात करण्यात आले.या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्ले अँड लर्नच्या संचालिका श्रीम.सुविधा साटम व विशेष अतिथी शाळेचे माजी

विद्यार्थी श्री.शैलेश तेलंगे उपस्थित होते.वर्गातील प्रत्येक विदयार्थ्याचा या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग होता.विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.विद्यार्थ्यांनी यावेळी मल्लखांब व स्केटिंग प्रात्यक्षिके दाखवून सर्व उपस्थितांची वाहवा मिळवली.

विविधरंगी शालेय परिपाठ दररोज घेतला जातो.यात विदयार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग असतो.विद्या विकास मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.किशोर पाटील यांनी परिपाठासाठी उपयुक्त लहान लहान गोष्टींची पुस्तके दिली आहेत.त्यातील गोष्टी रोज मुलांना सांगितल्या जातात.या संस्कारक्षम गोष्टींचा मुले आनंद घेतात.

कोटक एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने मुख्या श्रीम.धुमाळ व श्रीम.खाडे यांना शालेय कामकाजाचे प्रशिक्षण देण्यात आले. सर्व शिक्षकांसाठी देखील या संस्थेतर्फे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

आंतरशालेय स्पर्धा :

१० ऑगस्ट रोजी अक्षर संस्कार संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धेत इ.३ रीतील कु.मंथन दळवी यांचा प्रथम क्रमांक व कु. निधी पवार हिचा द्वितीय क्रमांक आला.श्रीम.खाडे यांनी देखील या स्पर्धेत सहभाग घेतला.

आंतरशालेय लंगडी व धावणे स्पर्धा या स्पर्धेत विदयार्थ्यांनी भाग घेतला होता.लंगडी स्पर्धेत मुले व मुली सेमी फायनल पर्यंत पोहोचले.

**आंतरशालेय नृत्य** स्पर्धेत ३ री व ४थी च्या विदयार्थ्यांनी सहभाग घेऊन आदिवासी नृत्य सादर केले.

**प्रज्ञाशोध परिक्षेत** इ. २ री ते ४ थी च्या विदयार्थ्यांनी भाग घेऊन यश मिळवले.या स्पर्धेतील यशस्वी विदयार्थी पुढीलप्रमाणे :

१) चांदणी बिराजदार २) रिषभ गारगोटे ३) समृद्धी मोरे ४) ध्रुवी सुतार ५) किमया तेलंगे ६) आदित्य बनसोडे ७) राहुल रणदिवे

**शालेय स्पर्धा** : वर्षभरात विदयार्थ्यांनी अनेक स्पर्धामध्ये भाग घेऊन यश मिळवले आहे.उदा : गीतगायन स्पर्धा हस्ताक्षर स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, चित्रकार स्पर्धा, क्रीडास्पर्धा त्याचप्रमाणे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवा निमित्त शाळेत अनेक स्पर्धा घेण्यात आल्या.उदा चित्रकला, रंग भरणे, रांगोळी स्पर्धा. वत्कृत्व स्पर्धा. तसेच मुलांनी महापौर चित्रकला स्पर्धेतही सहभाग घेतला.

मातृदिनानिमित्त दरवर्षी प्रमाणे यंदाही माता पालकांच्या पाककला स्पर्धा घेण्यात आल्या. पालकांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसादात ही स्पर्धा यशस्वी केली .

**हीरक महोत्सवानिमित्त झालेले कार्यक्रम**

सन्मा.श्रीम.इंदूमती झालटे यांचे ‘संस्कार ‘ या विषयावर पालकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

नूतन विदयामंदिर मानखुर्द या शाळेतील शिक्षक श्री. दीपक कदम यांचा विदयार्थ्यांसाठी आनंददायी कृतियुक्त गाण्याचा तास घेण्यात आला.या कार्यक्रमात ढोलकीपटू कुमार स्पर्श बागडे याने सरांना उत्तम साथ दिली.

१४ नोव्हेंबर रोजी श्रीसिद्धीविनायक विदयानिधी शाळेतील लिपीक श्री.सचिन तावडे सर यांचे पालकांसाठी स्त्री शक्तीचा जागर या विषयावर कीर्तन आयोजित करण्यात आले.

२६ नोव्हेबरला प्राथमिक विभागाच्या माजी मुख्याध्यापिका श्रीम . श्रदधा त्रिबंककर यांचे विदयार्थी व मोबाईल या विषयावर पालकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले,तसेच या दिवशी संविधान दिन साजरा करण्यात आला.

अधिकारी भेटी २४ जानेवारी के पूर्व / पश्चिम विभागाच्या शिक्षण निरीक्षिका सन्मा.भारती भवारी व के पूर्व/ पश्चिम विभागातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक यांनी शाळेला भेट देऊन विदयार्थ्यांची गुणवत्ता तपासणी केली.शालेय कामकाजा संदर्भात काही सूचना दिल्या.त्याचप्रमाणे सर्व शिक्षा अभियानाच्या अधिकारी सन्मा.यादव यांनीही शाळेला अचानक भेट देऊन शालेय कामकाजाची पहाणी केली.उत्तम कामकाजाबद्दल श्रीम.धुमाळ व सर्व शिक्षकाचे कौतुक केले.

राज्यस्तरीय अध्ययन संपादणूक सर्वेक्षण (SLAS-NAS) २४ मार्च २०२३ रोजी इ. ३ रीसाठी घेण्यात आलेले हे सर्वेक्षण शाळेत अतिशय सुनियोजितपणे पार पडले.

११ एप्रिल रोजी इ. ४ थी मधील विदयार्थ्यांसाठी सदिच्छा समारंभ कार्यक्रम घेण्यात आला.प्राथमिक विभागातून माध्यमिक विभागात जाताना होणारी भावना विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात व्यक्त केली.विदयार्थ्यांनी सहभोजनाचा आनंद घेतला.

शाळा प्रवेशोत्सव

१५ जून २०२३ रोजी शाळेचा पहिला दिवस मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.मुलांच्या स्वागतासाठी आकर्षक रांगोळया , वर्ग सजावट करण्यात आली प्रत्येक विद्यार्थ्याचे औक्षण करून, गुलाबपुष्पाने स्वागत करण्यात आले आकर्षक सेल्फी पॉइंट हे यावर्षी प्रवेशोत्सवाचे खास आकर्षण होते . मुलांनी सेल्फी पॉईंटमध्ये फोटो काढून आनंद व्यक्त केला.मुलांना चॉकलेट्स वाढून त्यांचा शाळेचा पहिला दिवस गोड व अविस्मरणीय केला.संस्थेचे कार्यवाह सन्मा श्री.अमित पाटील सर यांच्या शुभहस्ते शाळेच्या पहिल्या दिवशीच विदयार्थ्यांना शासनाकडून आलेल्या पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

२९ जून २०२३ रोजी आषाढी एकादशी निमित्त विदयार्थ्यांची दिंडी काढण्यात आली.टाळ मृदुंगाच्या गजरात, मुखाने विठ्ठल नामाचा जयघोष करीत सर्व विदयार्थी व पालक दिंडीत सहभागी झाले.विठ्ठल रखुमाई व वारकरी वेशातील विदयार्थी , भगव्या पताका हे दृश्य पाहून शाळेत जणू पंढरपूरच अवतरले आहे, असा भास होत होता.

